# Good Stories Of Nagpur Rural Police

## नागपूर (ग्रामिण) पोलीस मुख्यालय येथे योग प्रशिक्षणाला सुरूवात

पोलीसांच्या आरोग्यात सुधारणा करण्याहेतु आणि कर्तव्यामध्यही अधिक सक्षम व परिपुर्ण राहण्याकरीता केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालयाच्या **''योग प्रशिक्षण योजना''** अंतर्गत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आदेशान्वये नागपूर (ग्रामिण) पोलीस आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांच्याकरीता दिनांक ०८/१२/२०१६ रोजी पासून पोलीस मुख्यालय नागपूर, (ग्रामिण) टेका नाका येथे योग प्रशिक्षणाची सुरूवात करण्यात आलेली आहे.

सदर योग प्रशिक्षणाकरीता कैवल्यधाम, श्रीमन माधव योग मंदिर समिती लोणावळा, जिल्हा पुणे यांचे कडून प्रशिक्षीत श्रीमती. प्रियंका शेरेकर यांची नियुक्ती करण्यात आली असुन त्यांनी दिनांक ०८/१२/२०१६ पासुन पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यास सुरूवात केली आहे. पहिल्याच दिवशी नागपूर ग्रामिण मुख्यालयातील दंगा नियंत्रण पथक, उजळणी कोर्स, क्यु. आर. टी. पथक मधील एकुण ११६ अधिकारी/कर्मचारी यांनी लाभ घेतला.

पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना सततच्या बंदोबस्तामुळे आरोग्यावर ताण निर्माण झाल्याने, विश्रांती- आहारामधील अनियमितपणा या सर्व प्रकारामुळे त्यांच्या आरोग्याच्या तक्रारी वाढत असुन दैनंदिन कर्तव्यावर व कार्यक्षमतेवर त्याचा विपरित परिणाम होत आहे. आणि याकरीता पोलीसांच्या आरोग्यात सुधारणा होवुन ते कर्तव्यासाठी अधिक सक्षम व परिपुर्ण राहण्यासाठी पोलीस अधिक्षक नागपूर (ग्रामिण) श्री. अनंत रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली **''योग प्रशिक्षण योजना''** राबविण्यात येत आहे.



